


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २७ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# तिसऱ्या आघाडीची स्थापना, प्रकाश आंबेडकरांच्या निर्णयाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष

**वंचितच्या राज्य कार्यकारिणीच्या कोअर टीमच्या बैठकींचं सत्र**

**दरम्यान, काल (मंगळवारी) दिवसभर आणि रात्री उशिरापर्यंत प्रकाश आंबेडकरांच्या पक्षाचं अकोल्यात बैठकांचं सत्र चाललं आहे. या बैठकीला प्रकाश आंबेडकरांसह प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर पक्षाच्या नेत्या अंजली आंबेडकर, सुजात आंबेडकर, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, फारूख अहमद, मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे, जेष्ठ नेते अशोक सोनोने यांची उपस्थिती होती.**



**वादळवार्ता/ अकोला**

मंगळवारी वंचितच्या राज्य कार्यकारिणीच्या कोअर टीमची बैठक पार पडली. प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडीसोबत राहणार? स्वतंत्र लढणार की तिसरी आघाडी स्थापन करणार? यावर आजच्या पत्रकार परिषदेत निर्णय होणार आहे. स्वतः प्रकाश आंबेडकर आपली भूमिका पत्रकार परिषदेतून जाहीर करणार आहेत. पण त्यापूर्वी बुधवारी रात्री वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटलांची आंतरवाली सराटीत भेट घेतली. प्रकाश आंबेडकर आणि मनोज जरांगेंच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. तसेच, प्रकाश आंबेडकरांच्या मनात वेगळं काहीतरी चालल्याची शक्यता बळावली आहे. या दोघांच्या भेटीत अनेक राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा झाल्याची माहीती सुत्रांनी दिली आहे. रात्री उशिरापर्यंत पक्षाच्या भूमिकेवर नेत्यांमध्ये खल झाला आहे. या घडामोडीनंतर आज आंबेडकर महाविकास आघाडीत जाणार? स्वतंत्र लढणार की तिसरी आघाडी स्थापन करणार? याचा निर्णय होणार आहे. दरम्यान, काल महाविकास आघाडीनं आंबेडकरांना दिलेल्या पाच जागांच्या नवा प्रस्तावानंतर प्रकाश आंबेडकर काय निर्णय घेणार? याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. महाविकास आघाडीकडून वंचितला चारऐवजी पाच जागांचा प्रस्ताव वंचित बहुजन आघाडी संदर्भात महाविकास आघाडीची वेट अँड वॉच भूमिका असल्याचं दिसून येत आहे. वंचित बहुजन आघाडीला आता चार ऐवजी पाच जागांचा प्रस्ताव देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीकडून आणखी एक जागा अधिकची देण्याचा आज प्रस्ताव देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेना ठाकरे गटाची यादी ही वंचित बहुजन आघाडीच्या भूमिकेनंतर, म्हणजे बुधवारी जाहीर होणार आहे. भिवंडी, सांगली आणि जालना यासारख्या तिढा असलेल्या जागांचा प्रश्न सुटला असल्याची माहिती आहे. भिवंडीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष लढणार, जालन्याची जागा काँग्रेस तर सांगलीची जागा शिवसेना ठाकरे गट लढवणार असल्याची माहिती आहे. तसेच, दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघ शिवसेना ठाकरे गटच लढवणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

## सौ कोठेकर योगिता संजय यांना सामाजिक कार्यकर्त्या पुरस्कार पुण्यातील लाल महल येथे प्रदान

**वादळवार्ता/पुणे**



कवयित्री लेखिका तंत्रशिक्षिका शिवभूमी विद्यालय प्राथ विभागातील पुण्यातील लाल महल येथे दि २९ फेब्रू २०१४ रुग्ण हक्क परिषद पुणे शहर आयोजित भव्य शिवसन्मान सत्कार सोहळा संपन्न झाला या सोहळ्यात कवयित्री लेखिका तंत्रशिक्षिका श्रीम. कोठेकर योगिता संजय यांना सामाजिक कार्यकर्त्या पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला. रुग्ण हक्क परिषदेतर्फे आयोजित कार्यक्रमास प्रतिष्ठीत कार्यकर्ते ,मा उमेश चव्हाण , अपर्णा मारणे साठे तसेच अनेक महाराष्टातील कवि साहित्यिक दिग्दशक गायक उपस्थित होते . तेथील कार्यक्रमाची सुरवात छत्रपती शिवराय या काव्यरचनेने करून त्यांनी सर्वांची मने जिंकली त्यांची रचना सर्वांच्या काळजात घर करून गेली त्यांच्या सादरीकरणाचे सर्वांनीच टाळ्या वाजवून प्रतिसाद देवून त्यांचे कौतुक केले

कवयित्री लेखिका कोठेकर योगिता संजय यांच्या साहित्य व शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रकारच्या योगदानाबद्दल त्यांच्या याच सामाजिक व शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना सामाजिक कार्यकर्त्या पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्या निगडी येथील शिवभूमी प्राथमिक विभागात कार्यरत असून गेले २९ वर्ष ज्ञानदानाचे कार्य करीत आहे विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात चालण्यासाठी त्या विविध उपक्रम घेत असतात त्यामुळे त्या विद्यार्थ्यांमध्ये प्रिय आहेत त्याशिस्तीच्या शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात . सर्वच क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे .

## वरळी बी डी डी चाळ येथे उत्साहात होळी साजरी !

**वादळवार्ता/वरळी**



वरळी येथील स्थानिक पंचायत क्र. ४५ च्या वतीने अध्यक्ष सदानंद शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सालाबादप्रमाणे होळीकोत्सव साजरी करताना, महिलांचा हळदीकुंकू निमित्ताने भेट वस्तू व सर्व विद्यार्थ्यांना शाळेय साहित्य भेट वस्तू आणि पदाधिकारी यांचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. त्या वेळी विलास देवळेकर यांनी सुरुवातीला संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची आरती, त्या नंतर महिला हळदीकुंकू ची तसेच होळीची कविता सादर केली. ह्या प्रसंगी पदाधिकारी व सभासद पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. होळीची पुजा करुन, सर्व उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. आणि चिटणीस देवळेकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# ठेवीदारांचा गेली २० वर्ष सार्थ विश्वास मी जपला आहे आणि त्याचा शेवटही मीच करणार

## ठेवीदारांनी अफवां वर विश्वास ठेवू नये सुरेश कुटे

**दैनिक वादळ वार्ता प्रतिनिधि.**

बीड प्रतिनिधी

गेली वीस वर्षा वरील काळात मी बँकिंग क्षेत्रात ज्ञानराधा मल्टीस्टेट सर्व्हिसेस च्या माध्यमातून एक फार मोठा परिवार निर्माण केला आहे मराठवाड्यासारख्या मागास भाग म्हणून ज्याच्याकडे पाहिलं जायचं याच गावगाड्यात मनात एक संकल्प धरून नवयुवकांच्या तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून कापड व्यवसायाबरोबरच मल्टीस्टेट या व्यवसायात पुढे घेत ठेवीदारांचा एक विश्वास निर्माण करून त्यांच्या ठेवीवरील रकमेला कशा पद्धतीने व्याज देऊन त्यांच्या ठेवीचा सदुपयोग होऊन त्यांच्या संसाराला हात भार लाभला पाहिजे हे मनी इच्छा बाळगून त्यानुसार प्रत्येक ठेवीदाराला त्याचा मोबदला आज तागायत दिला आहे देत आहे परंतु गेली काही महिने ज्या पद्धतीचे अफवा निर्माण झाल्या या काळात जो या मल्टीस्टेटवर आर्थिक संकटाचा विषय पुढे आला यावेळेस याच्यावरही उपाय काढण्यासाठी मी अहोरात्र कष्ट घेत आहे.

आणि हे कष्ट घेत असताना आज अंतिम टप्प्यात निर्णय स्थितीत मार्ग सापडलेला आहे आणि या मार्गाद्वारे येणाऱ्या दोन-तीन दिवसात अडचण निर्माण झालेली ती दूर होऊन प्रत्येक ठेवीदाराचा पैसा हा त्याच्या हातात पडणार आहे ही मात्र कळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

आज ठेवीदारांना जे आंदोलन करण्यासाठी भले कुणी भाग पाडले असेल किंवा ठेवीदार त्यात आलेल्या संकटामुळे हतबल होऊन या आंदोलनात सहभाग होत असेल किंवा तो आंदोलन उभा करत असेल यात त्यांचा काहीही दोष नाही आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी त्यावर उपाय सापडण्यापाशी आपण या स्टेजला गेलात यातही माझी कुठली दुमत नाही परंतु जो मी विश्वास सार्थ केला आहे त्या विश्वासाला कधीही तढा जाऊ द्यायचा नाही ही माझ्या मनोमनी भावना असल्यामुळे आपला पैसा देण्याचे ही तितकेच माझे कर्तव्य आहे आणि ते मिळणारच परंतु संकट आल्यानंतर त्या संकटातून बाहेर निघण्यासाठी वेळ लागतो आणि तो वेळ मी मागत गेलेलो आहे आणि त्या वेळाची प्रतीक्षा आता संपलेली आहे कारण की ते माझे त्या वेळेत मी माझे आपल्याला देणारा पैसा हा उपलब्ध करून घेतला आहे त्यासाठी लागणारा काही टेक्निकल अडचणी आहेत त्याही आता दूर झालेले आहेत

## लोकसभा निवडणूक

### गुलामांच्या तोंडावर तुकडे फेकले जातात, संजय राऊत



शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज महायुतीवर निशाणा साधला. भाजपकडून आता छोट्या मित्रपक्षांना सोबत घेतलं जात आहे. याबाबत विचारलेल्या प्रश्नावर संजय राऊतांनी सडकून टीका केली. "गुलामांच्या तोंडावर तुकडे फेकले जातात. जे मांडलिक, गुमाल असतात, जे आश्रीत असतात त्यांना मागण्याचा अधिकार आणि हक्क नसतो. त्यांच्या तोंडावर तुकडे फेकले जातात. आमचं जागावाटप आम्ही महाराष्ट्रातच करतो.

### बारामतीचं महाभारत, पवारांमध्येच कृष्ण कोण ?



बारामतीमध्ये नणंद विरुद्ध भावजय लढाईत आता दोन जावा-जावांमध्ये सामना रंगलाय. अजित पवारांच्या भूमिकेविरोधात आधी श्रीनिवास पवारांनी टीका केली. त्यानंतर शर्मिला पवारांनीही विरोध करत रामायण-महाभारताचं उदाहरण दिलं., त्यालाच सुनेत्रा पवारांनी अप्रत्यक्ष उत्तर दिलंय. यावर अप्रत्यक्षपणे उत्तर देताना सुनेत्रा पवारांनी म्हटलंय की, श्रीकृष्णाच्या विरोधात सारी भावकी होती पण जिंकला तो कृष्णच, अशा कार्यकर्त्यांच्या भावना असल्याचं सुनेत्रा पवारांनी फेसबूक पोस्टमध्ये लिहिलंय

### नाशिकमध्ये भाजप, शिंदे गटाऐवजी भुजबळ?



राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ ओबीसी नेते असून देशपातळीवर त्यांना ओबीसी म्हणून प्रोजेक्ट करता येईल. देशभरात भाजपचा ओबीसी मतदार अधिक भाजपची स्वत: इमेज प्रो ओबीसी आहे. देशभरात ओबीसी नेतृत्वासाठी भुजबळांच्या चेहऱ्याचा फायदा घेता जावू शकतो. त्यासाठी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून शिंदे आणि अजित पवारांसोबत चर्चा सुरु असल्याची माहिती आहे. नाशिकची जागा सध्या शिंदेंच्या शिवसेनेकडे आहे. हेमंत गोडसे खासदार असून शिंदे गट आणि भाजप आमनेसाने आलेत. भाजपचे इच्छुक उमेदवार दिनकर पाटलांनी तर हेमंत गोडसेंना भाजप मतदान करणार नाही, असा पवित्रा घेतला.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंदू-मुस्लीमांत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न ?

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव. प्रतिनिधी -**

माजलगाव शहरातील मेनरोड वर असलेल्या जुन्या मर्कज मस्जिद वरील मागील बाजुलि एका माथेफिरूने 'जय श्रीराम'असा शब्द धुळवड साजरी झाल्या नंतर सायंकाळी ५वा.लिहून सामाजिक स्वास्थाला जातीयतेचा रोग लावण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या आश्वासक भूमिके वरुन माजलगाव शहरातील सर्व मुस्लिम बांधवांनी अतुलनिय सामंजस्याची भुमीका ठेवल्यामुळे ते षड्यंत्र उद्धवस्त झाले. सध्या मुस्लिम धर्मातील पवित्र असा रमजान महिना सुरू आहे, त्यातच हिंदू धर्मात अत्यंत उत्साहाने साजरा होणारा होळी,धुळवड सण २४,२५मार्च रोजी साजरा झाला या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस प्रशासनाने जिल्हाभरात चोख बंदोबस्त ठेवला होता ,आनंदात धुलीवंदन साजरे होत असताना माजलगाव एका समाजकंटकाने खोडसाळपणा करीत सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न केला. त्याचा हा प्रकार लक्षात आल्यानंतर काही काळ शहरात तणाव निर्माण झाला होता मात्र या प्रकरणात पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला. सध्या निवडणुकीचे दिवस असल्याने अनेकजण या निवडणुकीत वाद घालून मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करू शकतात हे मुस्लिम बांधवांनी हेरले. याही पुढे काही समाजकंटक असे अप्रिय प्रकार करण्याचा प्रयत्न करू शकतात मात्र समाजाने त्या समाजकंटकांचे मनसुबे उधळून लावले पाहिजेत अशी प्रामाणिक भावाना मुस्लिम धर्मीयां मध्ये रुजली असुन यात पोलिसांची भूमिका सुद्धा महत्त्वाची ठरते म्हणून जिल्हासपोअ.धिरज कुमार बच्चू यांनी तातडीने याची दखल घेत गुन्हा दाखल करुन घेत समाजकंटकाला शोधण्याची मोहीम सुरू केली. एवढेच नाही तर त्यांनी जमावाशीही संपर्क साधला, त्यांची समजूत काढली आणि आरोपीला २४ तासात प्रथम करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान २६ मार्च रोजी शांतता समिति ची बैठक माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे अयोजीत करण्यात आली होती या बैठकीला बीड जिल्हा पो.अधीक्षक नंदकुमार ठाकुर,सपोअ.उपविभागीय डॉ.धीरजकुमार बच्चु ,पोनि.केतन राठोड यांच्या सह सय्यद जाकीर मौलाना,रा. काँ शरद पवार चे जेष्ठनेते दयानंद स्वामी, शिवसेना (शिंदे)चे ता.अध्यक्ष तुकाराम येवले, युवानेते अभययसिंह होके पाटील,एमआयएम ता.अध्यक्ष इद्रिस पाशा, सपाचे जि.अध्यक्ष मुजम्मिल पटेल सहयुवानेतेफारुकअण्णाआदीउपस्थितहोते. सोळंके सह भाजपाचा नेता ,कार्यकर्ता बैठकिस अनुपस्थित. शांतता समिति च्या बैठकिस आमदार प्रकाश सोळंके व त्यांचा गटाचा एकहि कार्यकर्ता कार्यकर्ते अनुपस्थित राहिल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## संपादकीय

# कांजिण्या येण्याचं प्रमाण वाढतंय, जाणून घ्या कसे कराल बचाव

कांजिण्याचा संसर्गाचे प्रमाण वाढत आहे. फेब्रुवारी आणि मार्च दरम्यान याचा संसर्ग होण्याचं प्रमाण वाढतं. गेल्या महिनाभरात लहान मुलांमध्ये कांजिण्या होण्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. बदलते हवामान आणि वाढत्या तापमानामुळे या संसर्गजन्य आजारांची प्रकरणे देशात वाढत आहेत. आरोग्य मंत्रालयाने कांजण्यांपासून सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या डॉ. राजीव जयदेवन सांगतात की, तापमान वाढले की या रोगाचा धोका वाढतो. हा एक संसर्गजन्य रोग आहे, ज्यामध्ये संक्रमित व्यक्तीच्या अंगावर पुरळ उठून ताप आणि इतर अनेक प्रकारच्या गुंतागुंत होऊ शकतात. कांजिण्यांसोबतच काही राज्यांमध्ये गोवर आणि गालगुंडाचे प्रमाणही वाढले आहे.

अनेक शहरांमध्ये गोवरचे रुग्ण वाढत आहेत. गोवर आणि कांजिण्यांसोबत गालगुंडाच्या घटनांमध्ये देखील वाढ होत आहे. अनेक दवाखान्यांमध्ये फुगलेले गाल आणि सुजलेल्या जबड्यांसह अनेक मुले दिसत आहेत.

या संसर्गजन्य आजारांचा मुलांवर सर्वाधिक परिणाम होत आहे. म्हणूनच, पालकांनी प्रतिबंधात्मक उपाय करत राहणे महत्वाचे आहे जेणेकरून मुलांमधील या संसर्गजन्य रोगांचा धोका कमी करता येईल.

कशामुळे होतात कांजिण्या

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, कांजिण्या व्हॅरिसेला-झोस्टर नावाच्या विषाणूमुळे होतो. संक्रमित व्यक्तीच्या शरीरावरील पुरळ थेट संपर्कात आल्याने त्याचा प्रसार होण्याचा धोका असू शकतो. चिकनपॉक्सने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला खोकला किंवा शिंक येते तेव्हा हा संसर्ग पसरण्याचा धोका देखील असू शकतो.

ज्या लोकांना याआधी कांजण्या झाल्या नाहीत किंवा कांजिण्यांसाठी लसीकरण केलेले नाही त्यांना विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. एकदा कांजिण्या होऊ गेलेल्या लोकांमध्ये अँटिबॉडिज तयार झाल्यानंतर त्याचा धोका नंतर कमी असतो. पण काही लोकांना एकापेक्षा जास्त वेळा देखील कांजिण्या येऊ शकतात.

गोवर हा देखील बालवयात होणारा संसर्ग आहे. तो देखील इतरांपर्यंत सहज पसरतो. जेव्हा गोवर झालेली व्यक्ती खोकते किंवा शिंकते तेव्हा त्याचा प्रचार होण्याची शक्यता असते. गोवर विरुद्ध बालकांचे लसीकरण केल्यास त्याचा परिणाम कमी होतो. कोरोना महामारीच्या काळात मोठ्या संख्येने बालकांना लसीकरण न केल्यामुळे हा संसर्गजन्य रोग वाढण्याचा धोका आहे.

चिकनपॉक्स-गोवर टाळण्यासाठी उपाय

आरोग्य तज्ञांच्या मते, जर कांजण्या, गोवर आणि गालगुंड रोखायचा असेल तर सर्वोत्तम मार्ग म्हणजे लसीकरण करणे. लहान मुले, किशोरवयीन आणि प्रौढांसह प्रत्येकाने कांजिण्यांच्या लसीचे दोन डोस घेतले पाहिजे. MMR लस गोवर, कांजिण्या आणि गालगुंडापासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त आहे. लोकांना संक्रमित लोकांपासून योग्य अंतर राखण्याचा सल्ला दिला जातो. वेळोवेळी हात स्वच्छ धुतले पाहिजे

# भारतीय लोकसंख्या परिस्थिती सुधारणा हेतू!

(इंडियन इंडिपेंडन्स लीग-भारतीय स्वातंत्र्य लीग स्थापना दिवस विशेष.)

भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली.

इंडियन इंडिपेंडन्स लीगला आयआयएल म्हणूनही ओळखली जाते. ही एक राजकीय संघटना होती जी १९२० ते १९४०च्या दशकात ब्रिटिश भारताबाहेर राहणाऱ्यांना या प्रदेशावरील ब्रिटिश वसाहतवादी शासन हटवण्याच्या प्रयत्नात संघटित करण्यासाठी चालवली गेली. भारतीय राष्ट्रवादींनी स्थापन केलेले, त्याचे उपक्रम आग्नेय आशियातील विविध भागांमध्ये आयोजित केले गेले. त्यात भारतीय प्रवासी आणि नंतर, दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या भागात जपानच्या यशस्वी मलायन मोहिमेनंतर जपानी ताब्यांतर्गत निर्वासित भारतीय राष्ट्रवादीचा समावेश होता. मलायावरील जपानी ताब्यादरम्यान, जपानी लोकांनी मलायामधील भारतीयांना लीगमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले.

भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. प्रामुख्याने भारतीय राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जपानी पाठिंबा मिळवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली लीग विसर्जित होण्यापूर्वी मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या भारतीय राष्ट्रीय लष्कराशी संवाद साधण्यासाठी आणि कमांड देण्यासाठी स्थापन करण्यात आली. रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे आईएनए सुपूर्द केली. नंतर दक्षिण पूर्व आशियामध्ये सुभाषचंद्र बोसचे आगमन आणि आईएनएचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर आझाद हिंदला मार्ग देण्याआधी लीग त्यांच्या नेतृत्वाखाली आली.

दक्षिण-पूर्व आशिया व्यापल्यामुळे, मोठ्या प्रमाणावर प्रवासी भारतीय लोकसंख्या जपानच्या ताब्यात आली होती. युद्ध मलायापर्यंत पोहोचण्यापूर्वीच स्थानिक भारतीय संघटनांची चौकट अस्तित्वात होती. यापैकी सर्वात मोठे म्हणजे युद्धपूर्व सेंट्रल इंडियन असोसिएशन, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीग आणि इतर संघटनांचा समावेश होता आणि त्यांच्या सदस्यांमध्ये प्रख्यात भारतीय प्रवासी होते, उदा.केपीके मेनन, नेद्यम राघवन, प्रीतम सिंग, एससी गोहो आणि इतर. व्यवसाय प्राधिकरणाच्या प्रोत्साहनाने, या गटांनी स्थानिक भारतीय स्वातंत्र्य लीगमध्ये एकत्र येण्यास सुरुवात केली आणि स्थानिक भारतीय लोकसंख्या आणि जपानी व्यापाऱ्यांमधली प्रमुख संपर्कसंस्था बनली. इंडियन इंडिपेंडन्स लीगमध्ये सामील झाल्यामुळे सुरक्षा आणि फायदे मिळाले. आयआयएल कार्ड दाखवल्याने रेल्वे तिकिटाची खरेदी सुलभ झाली आणि टूथपेस्ट आणि साबण यासारख्या कठीण वस्तूंच्या आयआयएल मुख्यालयात वाजवी किमतीत खरेदी करता आली. हे एक साधन होते ज्याद्वारे रेशन जारी केले जात असे. याशिवाय आयआयएलला स्विस रेडक्रॉससोबत काम करण्याची परवानगी असल्याने सदस्यांना पत्रे मिळू शकत होती आणि सिलोनसारख्या ठिकाणी पोहोचणे कठीण होते.

रासबिहारी बोस हे एक भारतीय क्रांतिकारक होते, ज्याने सन १९१२च्या दिल्ली-लाहोरच्या कटाची योजना तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्रच्या हत्येसाठी केली होती आणि १९१५च्या गदर कटात त्यांचा सहभाग होता. राजाच्या शोधात रास बिहारी जपानला पळून गेले होते जिथे त्यांना सापडले. जपानी देशभक्त समाजातील अभयारण्य ठरले होते. त्यानंतर रास बिहारी बोस यांनी जपानी भाषा शिकली, एका जपानी महिलेशी लग्न केले आणि ते जपानी नागरिक बनले. मलायन मोहिमेच्या आधी आणि दरम्यान, रास बिहारी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या उद्दिष्टांसाठी जपानी प्रयत्नांमध्ये रस घेण्याचा प्रयत्न केला होता. फुजिवारा येथील उत्साहवर्धक अहवाल आणि स्थानिक स्वातंत्र्य लीगच्या स्थापनेसह, आईजीएचक्यूने आकार घेत असलेल्या भारतीय चळवळीचा विस्तार आणि एकत्रीकरण करण्यासाठी रास बिहारींची मदत मागितली. रास बिहारी यांनी आईजीएचक्यूला विकसित होत असलेल्या आईएनएला एका राजकीय संघटनेशी जोडण्याचा सल्ला दिला जो दक्षिण-पूर्व आशियातील नागरी भारतीय लोकसंख्येसाठी देखील बोलेल.

मार्च १९४२मध्ये त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लीगच्या स्थानिक नेत्यांना टोकियो येथे एका परिषदेसाठी आमंत्रित केले. हे आमंत्रण स्वीकारण्यात आले आणि दि.२८ मार्च १९४२च्या अखेरीस टोकियो हॉटेलमध्ये शिष्टमंडळ भेटले. टोकियो परिषद मात्र कोणत्याही निश्चित निर्णयापर्यंत पोहोचू शकली नाही. रास बिहारी यांच्याशी अनेक भारतीय शिष्टमंडळाचे मतभेद होते, विशेषत: जपानशी त्यांचे प्रदीर्घ संबंध आणि दक्षिण-पूर्व आशियामध्ये कब्जा करणारी शक्ती म्हणून जपानची सध्याची स्थिती पाहता आणि जपानी हितसंबंधांपासून सावध होते. परिषदेने भविष्यातील तारखेला बँकॉकमध्ये पुन्हा भेटण्याचे मान्य केले. भारतीय शिष्टमंडळ रास बिहारीसोबत एप्रिलमध्ये सिंगापूरला परतले.

सिंगापूरमध्ये रास बिहारी यांना एका सार्वजनिक सभेच्या अध्यक्षतेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. ज्यामध्ये ऑल-मलायन इंडियन इंडिपेंडन्स लीगची घोषणा होती. लीगचे प्रमुख नेद्यम राघवन, एक पेनांग बॅरिस्टर आणि एक प्रमुख मलायन भारतीय होते. प्रशासकीय मंडळात केपी केशवा मेनन आणि एससी गोहो, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीगचे नंतरचे अध्यक्ष होते. लीगने कार्यकारी शाखा म्हणून कृती परिषदेची निर्मिती, प्रादेशिक लीग ज्याला अहवाल देतील अशा मंडळाची निर्मिती, तसेच आईएनए आणि कौन्सिलमधील संबंध तसेच परिषद आणि जपानी प्राधिकरण. या प्रस्तावांवर टोकियो येथे भेटलेल्या प्रतिनिधींनी आणि जपानी भूमीपेक्षा इतरत्र झालेल्या बैठकीत मतदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाही सूचना आहेत की लीगचे सदस्य, ज्यात निरंजन सिंग गिल यांचा समावेश होता, ज्यांनी पीओडब्ल्यू शिबिरांचे दिग्दर्शन केले होते, ते लीग आणि स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात जपानी हेतूंबद्दल घाबरले होते. लीगला भारतीय लोकांमध्ये व्यापक पाठिंबा मिळाला; ऑगस्टच्या अखेरीस सदस्यसंख्या शंभर-हजाराच्या जवळपास असल्याचा अंदाज होता. युद्धकाळातील आणीबाणीच्या मध्यभागी आणि व्यावसायिक अधिकाऱ्यांशी व्यवहार करताना लीगमधील सदस्यत्व लोकसंख्येसाठी फायदेशीर होते. लीगच्या सदस्यत्व कार्डाने धारकाची ओळख भारतीय आणि एक सहयोगी म्हणून केली होती, त्याचा वापर रेशन जारी करण्यासाठी केला जात असे. पुढे लीगने स्थानिक भारतीय लोकसंख्येची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले, ज्यात आता बेरोजगार मजुरांचा समावेश आहे.

!! भारतीय स्वातंत्र्य लीग स्थापना दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलक व सुलेखक -**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हाट्सअॅप-**

# धनुष्यबाण सोडलं, आता हाती घड्याळ, शिवाजी आढळराव पाटील यांचा अखेर राष्ट्रवादीत प्रवेश

शिवसेना नेते शिवाजी आढळराव पाटील यांनी आज अखेर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आढळराव पाटील यांनी राष्ट्रवादीचं घड्याळ हाती घेतलं. शिवाजी आढळराव पाटील राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करतील, अशी गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा होती. त्यानंतर आज अखेर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. शिवाजी आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिरुर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळणार आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाचे उमेदवार अमोल कोल्हे यांच्या विरोधात अजित पवार गटाचे आढळराव पाटील अशी लढत आता बघायला मिळणार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत अमोल कोल्हे यांनी आढळराव पाटील यांचा पराभव केला होता. त्यानंतर आगामी निवडणुकीत पुन्हा अमोल कोल्हे विरुद्ध शिवाजी आढळराव पाटील अशी लढत बघायला मिळण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात वेगवेगळ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. प्रत्येक पक्षाकडून उमेदवारांची निवड केली जात आहे. काही ठिकाणी उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. सत्ताधारी आणि विरोधकांकडून जागावाटप निश्चित करण्यात येत आहे. या घडामोडी गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहेत. विशेष म्हणजे शिरुर लोकसभा मतदारसंघाबाबत गेल्या काही दिवसांपासून सस्पेन्स



वाढला होता. कारण या मतदारसंघात सध्या राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते अमोल कोल्हे हे खासदार आहेत. त्यामुळे या जागेवर अजित पवार गटाचा दावा होता.

आढळराव पाटलांनी शिवसेना का सोडली?

महायुतीच्या नेत्यांची जागावाटपाची चर्चा झाली त्यावेळी अजित पवार यांनी या जागेवर दावा सांगितला. दुसरीकडे शिवसेना नेते शिवाजी आढळराव पाटील हे या जागेसाठी आग्रही होते. ते या मतदारसंघाचे माजी खासदार आहेत. त्यांची या मतदारसंघात ताकदही आहे. त्यामुळे शिवसेनेला ही जागा मिळावी, अशी त्यांची मागणी होती. पण महायुतीत ही जागा राष्ट्रवादीला सुटणार असल्याची माहिती समोर आल्यानंतर आढळराव पाटील यांनी घड्याळ चिन्हावरही निवडणूक लढण्यासाठी अनुमती दर्शवली. यासाठी पडद्यामागे जोरदार हालाचाली घडल्या

# ज्योतीताई मेटे लागल्या प्रचाराला स्व. विनायक मेटे यांच्या समाधीस्थळाचे घेतले दर्शन

**वादळवार्ता/बीड**



स्व. विनायक मेटे यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेऊन ज्योतीताई मेटे या प्रचाराला लागल्या आहेत. यामुळे पुन्हा नवे ट्विस्ट आले असून नेमकं त्या राष्ट्रवादी कॉंग्रेस कडून लढणार की, इतर कोणाकडून हे येणाऱ्या काळात समजणार आहे. सुरुवातीपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गट यांच्याकडून बीड लोकसभा उमेदवारीसाठी ज्योती मेटे या चर्चेत आहेत. परंतु बजरंग सोनवणे यांनी घड्याळाची साथ सोडून तुतारी हाती घेतली, यामुळे बजरंग सोनवणे यांचेही नाव वेगाने चर्चेत आले. यानंतर पंकजा मुंडे यांनी शिवसंग्राम आपल्या सोबत असल्याचे म्हटले तर ज्योती मेटे यांचे नाव काहीसे मागे पडल्या सारखे झाले. परंतु मंगळवारी शिवसंग्राम भवन येथे कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. येणारी लोकसभा निवडणूक लढविण्या बाबतीत चर्चा झाली. तेथून सरळ स्व. विनायक मेटे यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेऊन लोकसभा प्रचाराला सुरुवात केली असल्याची माहिती फोनवरून देण्यात आली. उमेदवारी दिली तर आम्ही राष्ट्रवादी कडून लढण्यास तयार असल्याचे सांगितले असल्याने पुन्हा उमेदवारीचे ट्विस्ट निर्माण झाले असून नेमकं उमेदवारी मेटेंना की, सोनवणेंना याबाबत चर्चेला उधाण आले आहे.

# भूमिगत दारुगोळा, गोळीबार प्रशिक्षण केंद्राचे जतन व संवर्धन होणे आवश्यक : रैफ भाई बिल्डर



दैनिक वादळ वार्ता
अंबाजोगाई /परवेज पटेल

शिक्षणाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या अंबाजोगाई शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला असून, शहरात प्रेक्षणीय इमारती, योगेश्वरी देवीचे मंदिर, हजरत शेख मसूद किरमानी बाबा दर्गाशरीफ, हजरत मौला आली टेकडी, हत्तीखाना, बुटे नाथ परिसरातील रेणुका देवी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज स्वामी मंदिर, आदी धार्मिक मंदिर, दर्गा, आणि निजाम कालीन इमारती आहेत. हे अंबाजोगाई शहराचे सौंदर्य समजले जाते. अशीची एक वास्तू फायरिंग ची टेकडी भूमिगत दारूगोळा कोठार असून याची पडझड झाली आहे. याच्याकडे संबंधितांनी लक्ष देणे गरजेचे आहे आणि याचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे असे सामाजिक कार्यकर्ते रैंफ भाई बिल्डर यांनी प्रतिनिधीशी संवाद साधताना आपले मत व्यक्त केले. पुढे रैफ भाई बिल्डर यांनी म्हटले की, स्नेह नगरच्या समोर चादमारी म्हणून फार मोठे मैदान आहे, आज ते शेतकी विभागाच्या ताब्यात असून बुटेनाथकडे जाणाऱ्या चादमारीचे मैदान परिसर निजाम कालीन घोडदळ मध्ये असलेल्या घोड्यांचे प्रशिक्षण केंद्र होते, इथे फक्त घोडे अन घोडेच दिसायचे, वर दवाखान्याच्या तबेलयातून या घोड्याना इथं या मैदानात आणून त्यांच्या कवायती चालायच्या, सकाळी हे मैदान भरलेले दिसायचे, ह्या अरबी घोड्याना ट्रेन करणारे विदेशी

# दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ करणार रक्तदान

## माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

**वादळवार्ता/बीड**



आम आदमी पार्टीचे दिल्ली येथे जनतेने प्रचंड बहुमताने निवडून दिलेले आम आदमी पार्टीचे सर्व सर्वे मा. अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री दिल्ली सरकार यांना ईडीच्या माध्यमान भारतीय जनता पार्टीच्या केंद्रातील सरकारने मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने विरोधकांना जेलमध्ये टाकण्यासाठी आणीबाणी सारखी परिस्थिती देशांमध्ये निर्माण करून विरोधक नागरिक सामान्य जनता यांच्यामध्ये भिंतीचे वातावरण निर्माण केले आहे ज्यांच्या वरती ईडीसीबीआयचे आरोप असून जर ते भारतीय जनता पार्टी या पक्षामध्ये सहभागी झाले तर हीच ईडीसीबीआय त्यांचे सर्व गुन्हे माफ करते व त्यांना विसरून जाते परंतु हेच डी सी बी आय जर भारतीय जनता पार्टीच्या विरोधी पार्टीमध्ये सहभागी होत नसेल तर त्यांना चौकशीच्या नावाखाली वर्षानुवर्ष जेलमध्ये ठेवण्याचे काम करतं आहे आशा सरकारच्या विरोधामध्ये आम आदमी पार्टी चे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक झाली असून याच्या निषेधार्थ आम आदमी पार्टी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये २८ मार्च २०२४ गुरुवार रोजी सकाळी दहा तीस ते एक वाजेपर्यंत जिल्हा शासकीय रुग्णालय रक्तपेढी येथे शेकडो कार्यकर्ते आपले रक्त दान करून केजरीवालांना समर्थन देण्यासाठी व भारतीय जनता पार्टीच्या या कारवाईचा निषेध म्हणून रक्तदान करणार आहे यामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान आम आदमी पार्टीचे जिल्हा अध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे हे करत आहे

# जम्मू-कश्मीर येथील राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत चि.सूर्या सचिन सौंदळे यास सूवर्णपदक

**वादळवार्ता/परळी वैजनाथ**

पंचम ज्योतीर्लिंग वैद्यनाथाच्या परळी नगरीतील सुपुत्र चि.सूर्या सचिन सौंदळे याने जम्मू-कश्मीर येथील राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टिक स्पर्धेत नॅशनल डेव्हलपमेंट (9ते11वर्षे) वैयक्तिक गटातून सुवर्णपदक व त्याशिवाय मिश्र तिहिरी चे रौप्य पदक पटकावले तर त्याचीच ज्येष्ठ भगिणी कु.सानवी सौंदळे हीने सब ज्युनिअर गटात यश मिळवत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.

चि.सूर्या व कु.सानवी सख्खे भाऊ-बहीण यांच्या दैदीप्यमान यशामुळे आपल्या परळी शहराचेच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्हा,मराठवाडा प्रदेश व महाराष्ट्र राज्याचे नांव उज्जवल केले आहे.

सूर्या-सानवी परळी-वैजनाथ येथील ज्येष्ठ पत्रकार तथा समुपदेशक जी.एस.सौंदळे (गुरूजी) यांची नातू-नात असून,राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज तपोनुष्ठान समिती परळीचे अध्यक्ष तथा नगरसेवक चेतन सौंदळे यांचे पुतणे आहेत.

राष्ट्रीय एरोबिक जिम्नॅस्टीक स्पर्धा मौलाना आझाद(एम ए) स्टेडीअम जम्मू-कश्मीर येथे दि.२२ ते २४ मार्च २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून तसेच छत्रपती संभाजी नगरच्या खेळाडूंसह देशातील विविध राज्यातून एरोबिक जिम्नॅस्टिक खेळाडूंची निवड करण्यात आली होती.

सदरील स्पर्धेत राष्ट्रीय डेव्हलपमेंट गटातून चि.सूर्या सौंदळे याने व्यक्तिक गटातून सुवर्णपदक प्राप्त केले तर ट्रिओ गटातून रौप्य पदक पटकावले तसेच कु.सानवी सौंदळे हीने ईतर खेळाडूंसह सब ज्युनि्अर गटातील जम्मू-कश्मीर येथील राष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.



भारत देशाच्या विविध राज्यातील खेळाडूंसह महाराष्ट्राचा संघ नॅशनल डेव्हलपमेंट ग्रुप, सब ज्युनिअर,ज्युनिअर, सिनीअर,अशा चार वयोगटात पुरूष एकेरी,महिला एकेरी,मिश्र दुहेरी,तिहेरी समुह व एरो डान्स या सादरीकरण प्रकारात खेळाडू सहभागी झाले होते.

जम्मू-कश्मीर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय जिम्नॅस्टीक स्पर्धेतून मे महीण्यात होणा-या सुझुकी वर्लडकप,जपान व एरोबिक जिम्नॅस्टीक्स एशियन चॅम्पिअनशिप,व्हितनाम या दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारतीय संघाची निवड होणार आहे.

महाराष्ट्राच्या संघासाठी अध्यक्ष संजय शेटे राज्य संघटनेचे उपाध्यक्ष डॉ.आदित्य जोशी,तांत्रिक समिती सदस्य मकरंद जोशी,प्रशिक्षक व पंच विवेक देशपांडे,अमेय जोशी,डॉ. निलेश जोशी,ईशा महाजन,दिपाली बजाज,हर्षल मोगरे,ऋग्वेद जोशी,हर्षद कुलकर्णी,संघ व्यवस्थापक राहुल पहुरकर व साक्षी लड्डा सह ईतर प्रशिक्षकांचे मौलिक मार्गदर्शन खेळाडूंना मिळाले.

सूर्या-सानवी बंधू-भगिणीसह महाराष्ट्रातील खेळाडूंनी जिम्नॅस्टिक सारख्या खेळात मिळविलेल्या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन तसेच आंतर राष्ट्रीय स्पर्धेच्या यशासाठी सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# "शब्द सुमने"शिर्षक आसलेल्या कवीता संग्रहाचे मोठ्या थाटात प्रकाशन करण्यात आले




**दैनिक वादळ वार्ता**

कवी -श्री गोरखनाथ पवार निंभारी ता. नेवासा यांचेलोककला कलावंत साहित्य परिषदेचे सदस्य व अध्यक्ष कवी श्री बाबासाहेब पवार आयोजीत साहीत्य संमेलन १०मार्च २०२४रोजी उत्साहात पार पडले.साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सायमन भारस्कर, चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर,सय्यद बाबा शेख (रा. स. प. महाराष्ट्र राज्य कार्य का. सदस्य) प्रा डॉ बाबुराव उपाध्ये, कवी सुभाष सोनवणे ,आला बाबूराव फेम सुरेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते लहानु खरात, विजय शेलार ,सरपंच भरत पवार ,दादासाहेब झिंज, रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष दादा त्रिभुवन, प्राचार्य गुंफा कोकाटे, सोसायटी चेअरमन दिलीपराव पवार ,आदी उपस्थित होते.

चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर आपल्या मनोगतात म्हणाले जीवनात हिणवणारी थकवणारी माणसे भेटतात म्हणून आपण निराश व्हायचं नसतं या सर्व गोष्टींना झुगारून पुढे जायचं असतं माणसाच्या जीवनात जर गाणं नसेल तर त्या माणसाचं रडगाणं होतं म्हणून शब्दांशी मैत्री करा आणि मनसोक्त जगा. सय्यद बाबा शेख विजय शेलार सुभाष त्रिभुवन आदींनी आपली मनोगत व्यक्त केली दुपारच्या सत्रात सुभाष चारूडे यांच्या समाज प्रबोधनात्मक चित्रांचे प्रदर्शन पार पडले कवी गोरखनाथ पवार यांच्या शब्दसुमने या कवितासंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

# उद्धव ठाकरेंच्या आदेशाचे पालन करू : व्हनाळीत संजयबाबा घाटगे गटाची बैठक

## शाहू महाराजांच्या पाठीशी ठाम राहण्याचा निर्धार

**वादळवार्ता /कुडूत्री**

सध्याच्या बदललेल्या राजकिय समिकरणांचा आणि परिस्थितीचा विचार करता संजयबाबा घाटगे गटाचा राजकिय विरोधक आता ठरलेला आहे. त्यामुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा आदेश प्रमाण मानून आम्ही काम करू आणि सकारात्मक राजकारणासाठी हर एक परिस्थीतीत हिंद्वी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व समतेचा महामेरू छत्रपती शाहू महाराज यांचे वंशज छत्रपती शाहु महाराज यांच्या विजयासाठी जिवाचं राण करू असा निर्धार व्हनाळी ता.कागल येथील संजयबाबा घाटगे गटाचे कार्यकर्ते व शिवसैनिकांच्या बैठकीत करण्यात आला. यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थावरून बोलताना संजयबाबा घाटगे म्हणाले, आम्ही राजकिय जिवणात कोणावार विनाकारण पलटवार केले नाहीत. आणि कुणासमोर गुडघेदेखील टेकले नाहीत आम्ही घेतलेला निर्णय ठाम असून शाहू महाराजांच्या विजयासाठी मी व माझे कार्यकर्ते जिवाचे राण करतील. शाहू महाराजांना मिळालेल्या उमेदवारीमुळे जिल्ह्यात साकारात्मर राजकारणाची नांदी होईल.छत्रपती शाहूंच्या विचारांना पाठबळ देऊया

गोकुळचे संचालक अंबरिषसिंह घाटगे म्हणाले, सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी आम्ही संजयबाबांना खासदारकीची उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न केले. या राजकिय परिस्थीतीमध्ये अन्याय- न्याय यामध्ये आम्ही कधीच पडणार नाही या सर्वापेक्षा तालुक्याचे हित सर्वात महत्वाचे आहे. आमचा राजकिय विरोधक कोण हे आता जवळजवळ ठरलेलं आहे. त्यामुळे ठाकरेंचा आदेश प्रमाण मानून आम्ही शाहू महाराजांच्याच पाठीशी राहू जिल्ह्याचा खासदार ठरविण्याची ताकद संजयबाबा घाटगे गटात आहे हे कोणीही विसरता कामा नये असे ते म्हणाले.




यावेळी विजय जाधव,वैभव आडके,आनंदा भिऊंगडे,दिलीप चौगले,बाबूराव शेवाळे,विलास पाटील,संभाजी भोकरे,जयसिंग टिकले,युवराज कोईगडे,अशोक पाटील,मुकुंद बोडके,मल्हारी पाटील, के.के. पाटील यांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमास दिनकर पाटील,आनंदा साठे, ए.वाय पाटील,रणजित मुडूकशिवाले, सिद्रमा गंगाधरे ,एम. बी. पाटील,धनाजी गोधडे, विनायकराव घोरपडे, विलास पोवार,शिवगोंड पाटील,महेश देशपांडे, आल्लाबक्ष शहाणेदिवाण,बाजीराव पाटील, संभाजी भोसले,राजू भराडे,अनिल देसाई,सुभाष कांबळे,शिवाजी शेळके,रामदास किल्लेदार,एस.टी.पाटील,सुनिल पाटील शिवसैनिक, कार्यकर्ते उपस्थित होते. स्वागत नानासो कांबळे यांनी केले आभार रमेश जाधव यांनी मानले.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता



संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची वंचित बहुजन आघाडीचे नेते बाळासाहेब आंबेडकर यांनी अंतरवली सराटी येथे जाऊन सदिच्छा भेट घेतली. नेमकी या भेटीमध्ये काय चर्चा झाली याकडे सपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# अबब..मुख्याध्यापकांना वाटली कशी नाही लाज.. शिक्षिकेलाच मागितली एक हजाराची लाच...

**दैनिक वादळ वार्ता**
**छत्रपती संभाजीनगर/प्रा. संजय तुपे**

सोशल अँड कल्चरल असोसिएशन कंसूबे ता,जि धुळे संचलित आदर्श हायस्कूल, कंसूबे ता,जि धुळे चे मुख्याध्यापक प्रदीप पुंडलिक परदेशी तक्रारदार यांचे कडून १०००/रु लाचेची मागणी करून सदरची रक्कम स्वतः स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल तक्रारदार ह्या सोशल अँड कल्चरल असोसिएशन कुसुंबे दाजी धुळे संचलित आदर्श हायस्कूल कुसुंबे धुळे येथे उपशिक्षिका पदावर कार्यरत आहेत मुख्याध्यापक परदेशी यांनी सदर शाळेत आयोजित केलेल्या उपक्रमाकरिता खर्च झाल्याचे निमित्त करून शाळेतील सर्व कार्यरत शिक्षक यांच्याकडून प्रत्येकी १०००/व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून प्रत्येकी ८०० रुपये जमा करणे बाबत बैठक घेऊन सांगितले होते त्यास तक्रारदार यांनी विरोध दर्शविला होता त्यामुळे मुख्याध्यापक प्रदीप पुंडलिक परदेशी यांनी तक्रारदार यांना पैसे दिल्याशिवाय हजेरी रजिस्टर वर सही करण्यास नकार दिला होता त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांच्याकडे मुख्याध्यापक परदेशी यांनी एक हजार रुपये लाचेची मागणी केल्याची लाचलूचपत प्रतिबंधक विभाग धुळे यांच्याकडे दूरध्वनी द्वारे माहिती दिली होती त्यावरून धुळे विभागाच्या पथकाने कुसुंबे येथे जाऊन तक्रारदार यांची तक्रार नोंदवून घेतली सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८/०३/२४ रोजी पडताळणी केली असता मुख्याध्यापक परदेशी यांनी पंचायत समक्ष एक हजार रुपये लाचेची मागणी करून दिनांक १९/०३/२४ रोजी सदर राजेची रक्कम आदर्श विद्यालय कुसुंबे ताजी धुळे येथील मुख्याध्यापक यांच्या कक्षात स्वतः स्वीकारताना मुख्याध्यापक परदेशी यांना रंगीहात पकडण्यात आले असून त्यांच्या विरुद्ध धुळे तालुका पोलीस स्टेशन जिल्हा धुळे येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू केले सदरची कारवाई लाच लुचपत विभाग धुळे पोलीस उपअधीक्षक श्री अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत बेंडाळे,पोलीस निरीक्षक मनजीत सिंह चव्हाण, पोलीस निरीक्षक रूपाली लांडवी, तसेच पथकातील राजन कदम, मुकेश अहिरे, मकरंद पाटील, प्रशांत बागुल, संतोष पवार, प्रवीण मोरे, प्रवीण पाटील, रामदास बारेला ,सुधीर मोरे, या पथकाने केली आहे सदर कारवाईस नाशिकलाच लचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परीक्षेचे पोलीस अधीक्षक मा श्रमिष्ठा वालालकर, अप्पर पोलीस अधीक्षक मां श्री माधव रेड्डी, पोलीस अधीक्षक नरेंद्र पवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे असे पोलीस उपआधीक्षक अभिषेक पाटील यांनी माहिती दिली



## सौ. अर्चना ब्राम्हणकर श्रीहरी प्रतिष्ठान नामपूर यांच्या वतीने नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित

**वादळवार्ता/प्रतिनिधी**



श्रीहरी प्रतिष्ठान, नामपूर यांच्यावतीने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. सौ. अर्चना गोविंद ब्राम्हणकर ह्यांना सामाजिक कार्यातील योगदानासाठी नारिशक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला. ह्या सोहळ्यात प्रोत्साहन फॉउंडेशन अध्यक्ष श्री. गिरीश वाणी, लाडशखीय वाणी समाज मंडळ, संभाजी नगर श्री. राजेंद्र वाणी, सेवाभावी कार्यकर्त्या संगिता बोरसे, सौ. चित्रा चितोडकर अध्यक्षा बहुउद्देशीय संस्था धुळे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ठ आयोजन श्रीहरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरद नेरकर, सरचिटणीस सौ स्नेहलता नेरकर, प्रोत्साहन फॉउंडेशन समिती सदस्य श्री. प्रकाश मालपूरे, श्री. प्रदीप गहिवरे, श्री. शशिकांत महालपुरे, श्री. पाटकर आदी मान्यवरांनी केले होते.

## शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांच्या गाटी भेठींचा झंझावाद नि जनतेचा तुफान प्रतिसाद

### कठिकाणी सोनवर्णेचे स्वागत, सवांद साधून चर्चा

**वादळवार्ता/केज**



**बीड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी गृहीत शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांनी भेटीगाठी भर दिला आहे. मंगळवारी सकाळी त्यांनी येडेश्वरी कारखान्यावरील पवनसुत हनुमान मंदिरात दर्शन घेत युसुफवडगाव गटातील गावच्या मंदिरात दर्शन घेतले. गावकऱ्यांशी संवाद साधून चर्चा केली. यावेळी गावकऱ्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले.**

**शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांचा युसुफवडगाव येथे आगमन होताच सरपंच महेश गायके, माजी सरपंच रुपेश बोरगावकर, सचिन जावळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी गावचे ग्रामदैवत श्रीराम मंदिरात जाऊन सोनवणे यांनी दर्शन घेतले. गावकऱ्यांच्या गाठीभेटी घेत त्यांनी संवाद साधला. यावेळी पंचायत समितीचे सदस्य उमाकांत भुसारी, चेअरमन अरुण चोपणे, माजी चेअरमन श्रीहरी चोपणे, खरेदी विक्री संघाचे संचालक बाळासाहेब निशिगंध, केज बाजार समितीचे संचालक अरुण राऊत, व्हाईस चेअरमन महादेव मोडवे, उपसरपंच महेश लामतुरे, चंद्रकांत सातपुते यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.**

**गोटेगाव येथील माजी सरपंच तथा संजय गांधी निराधार समितीचे माजी अध्यक्ष बालासाहेब बोराडे यांच्या निवासस्थानी बजरंग सोनवणे यांनी भेट देत त्यांच्याशी चर्चा केली. सोनेसांगवी येथे विखे पाटील साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन आप्पासाहेब ईखे यांच्या निवासस्थानी भेट देऊन चर्चा केली. त्याचबरोबर सरपंच मुकुंद कणसे यांच्या निवासस्थानी ही भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी माजी सरपंच विजयकुमार ईखे, बालासाहेब नाईकवाडे, माजी सरपंच मनोहर इटकर, शाहूराव ठोंबरे, उपसरपंच राहुल डिकले, महेश गायके, बब्रुवान कणसे, लक्ष्मण खोडसे, माणिक गुळवे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.**

## गंगापूर कृषि उत्पन्न बाजार समिती येथे कांदा खरेदी विक्री मार्केटचा शुभारंभ

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा.संजय तुपे**



गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे दि. २६/०३/२०२४ रोजी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवार येथे कांदा मार्केट ( खरेदी- विक्री) शुभारंभ करण्यात आला.या वेळी शेतकरी व व्यापारी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मोकळा कांदा लिलावामध्ये जास्तीत जास्त भाव रूपये १५५१/- भाव मिळाले आहे. यावेळी बाजार समितीचे सचिव यांनी अवाहन केले की, आपला कांदा प्रतवारी करूनच बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणावा जेणे करून उच्च प्रतिच्या मालास उच्च भाव मिळेल व शेतकऱ्याचा फायदा होईल. यावेळी कांदा उत्पादक शेतकरी, व्यापारी, कर्मचारी, हमाल, मापाडी आदी उपस्थित होते. कांदा लिलाव वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे. सोमवार, बुधवार व शुक्रवार :- मोकळा कांदा लिलाव सकाळी १०:०० वाजता असेल तर मंगळवार, गुरूवार व शनिवार गोणी कांदा लिलाव दुपारी १२:३० वाजता सुरू केला आहे तरी सर्व शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन बाजार समितीचे सचिव यांनी केले आहे.

## भेंडाळा प्राथमिक आरोग्य केंद्र असून नुसते नावापुरतेच

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा.संजय तुपे**

भेंडाळा (ता. गंगापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे नावालाच प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे.या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती असताना एकही अधिकारी हजर राहत नसल्यामुळे औषध निर्माता व शिपाई यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्राचा भार असल्याचा प्रकार शनिवारी समोर आला आहे. मिटिंगच्या नावाखाली वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी सर्रास दांड्या मारत असल्याचा आरोपी यावेळी ग्रामस्थांनी केला आहे. शनिवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर भेंडाळाजवळील आरोग्य केंद्रासमोरच एक अपघात झाला होता.एका भरधाव कारने शिर्डीहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या एका दुचाकीला पाठीमागून झोराची धडक मारली होती.या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर पडला होता.यावेळी रस्त्यावरील स्थानिकांनी तसेच इतर प्रवाशांनी त्यास भेंडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र दुपारच्या २ वाजून २०मिनिटांनी प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्य द्वारच बंद होते.सोबतच्या काही जणांनी चौकशी केली असता, आरोग्य केंद्रात फक्त एक महिला औषध निर्माती आणि एक शिपाई उपस्थित होते. दोन्ही वैद्यकीय अधिकारी आणि इतर कर्मचारी गंगापूर येथे मिटिंगला गेल्याचे सांगण्यात आले.



यावेळी ग्रामस्थांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. छाया आवरगावकर यांना फोन केला असता, मी मिटिंगला असून बाकी कर्मचारी आरोग्य केंद्रात उपस्थित असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र प्रत्यक्षात आरोग्य केंद्रात इतर कुणीही हजर नसल्याने नाइलाजाने औषध निर्माता व शिपायाकडून नाममात्र उपचार करण्यात आले. रुग्णाला धनुर्वाताचे इंजेक्शन देऊन पुढील उपचारासाठी गंगापूर येथे नेण्यास सांगितले. छत्रपती संभाजीनगर- अहमदनगर- पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेले हे आरोग्य केंद्र, महामार्गावर होणाऱ्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर चोवीस तास रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असणे अपेक्षित आहे. मात्र यंत्रणेच्या उदासीनतेमुळे रुग्णांचे हाल होत आहेत. शनिवारी ज्या मिटिंगचा बहाणा करून कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी आरोग्य केंद्रातून गायब होते, ती मिटिंग खरोखरच होती का, याची चौकशी करणे आवश्यक आहे. आणि जर खरोखरच मिटिंग असेल तर आरोग्य केंद्र वाऱ्यावर सोडून येथील सर्व कर्मचारी अशा मिटिंगला बोलावणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अशा मिटिंगसुद्धा ऑनलाइन शक्य आहे. वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आरोग्य केंद्रात उपस्थित राहून रुग्णसेवेला प्राधान्य देण्याची गरज आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )